|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी क्र.१**

जळगाव.८ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने ` यशोवल्लभ `व्याख्यानमालेतंर्गत उदया शुक्रवार दि.९ फेब्रुवारी रोजी सुप्रसिध्द वैज्ञानिक तथा एल.व्ही.प्रसाद आय.इन्स्टिटयूट, हैदराबादचे संशोधन संचालक पद्श्री डी.बालसुब्रहमण्यन यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

अॅड.गिरिधरलाल गुजराथी, धुळे यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.९ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी १०.३० वाजता पद्मश्री डॉ.डी.बालसुब्रहमण्यन यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर राहतील. यावेळी धुळे येथील अॅड.गिरीधरलाल गुजराथी यांची उपस्थिती राहणार आहे.

चैतन्य म्हणजे नुसती चलनवलनाची शक्ती नव्हे तर जाणीव आहे, तीही स्वतःच्या अस्तित्वाची, आवडी-निवडीची. तिचा अभ्यास आधुनिक विज्ञानाने जोमाने सुरु केला असून खान्देशातील विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी हे व्याख्यान मार्गदर्शक असे ठरणार आहे. तेव्हा, या व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव भ. भा. पाटील यांनी केले आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. 9 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतर्फे दि.15 व 16 फेब्रुवारी, 2018 रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत `उन्नत पर्यावरण विज्ञान आणि भु-स्थानिक तंत्रज्ञान` या विषयावर विविध संशोधक आणि तंत्रज्ञानांकडून संशोधनपर मार्गदर्श होणार असून विविध शोधपत्रांचे सादरीकरण होणार आहे. या कार्यशाळेचे मुख्य अतिथी म्हणून डॉ.मिलिंद मुजूमदार,वरिष्ठ शास्त्रज्ञ, भारत मौसम (हवामान) विज्ञान विभाग, पुणे यांची उपस्थिती लाभणार आहे. डॉ.गोपाल क्रिष्णा, हैदराबा, डॉ.डी.एस.रामटेके, निरी नागपूर, प्रा.महादेव मुळे व प्रा.फिरके, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, प्रा.चंद्रशेखर मातली, एन.आय.टी, वारंगल, प्रा.एस.के.जी.क्रिष्णम्माचार्यालू स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यशाळेच्या आयोजनासाठी संचालक, प्रा.डॉ.एस.टी.इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव डॉ.व्ही.एम.रोकडे, डॉ.एस.एन.पाटील, डॉ.एस.आर.थोरात, डॉ.पी.आर.पाटील, डॉ.एस.बी.अत्तरदे, श्री.के.पी.दांडगे परिश्रम घेत आहेत. परिसरातील विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळेतील विद्यार्थी यांनी सदर कार्यशाळेत सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ८ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी